शिक्षण प्रसारक संस्थेचे

# श्री. ओंकारनाथ मालपाणी विधी महाविद्यालय, संगमनेर

## वार्षिक अहवाल 2020-21

शिक्षण प्रसारक संस्थेने सन 1998 ला संगमनेर तालुक्यातील विद्यार्थ्यांना श्री. ओंकारनाथ मालपाणी विधी महाविद्यालयाच्या रुपाने एक नवीन शैक्षणिक दालन सुरु केलेले आहे. या महाविद्यालयाचा सन 2020-21 चा शैक्षणिक वर्षाचा संक्षिप्त अहवाल मी मांडत आहे.

- **शैक्षणिक कामगिरी :-**

शैक्षणिक वर्ष 2020-21 मध्ये विधी महाविद्यालयामध्ये आजपावेतो सर्वात जास्त 439 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. महाविद्यालयाने राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) साठी विद्यार्थ्यांना पंधरा दिवस मोफत मार्गदर्शन केले. आजपावेतो आपल्या महाविद्यालयाचे 18 विद्यार्थी तसेच महाविद्यालयाचे 11 शिक्षक न्यायाधीश झालेले असून इतर क्षेत्रातही आपल्या महाविद्यालयाचे विद्यार्थी कार्यरत आहेत.

- **विद्यार्थी सहभाग :-**

शैक्षणिक वर्ष 2021-21 मध्ये विधी महाविद्यालयाने आयोजीत केलेल्या अभिरुप न्यायालय स्पर्धेत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. विविध विद्यापीठ, महाविद्यालयांनी आयोजीत केलेल्या कार्यशाळा व परिषदांमध्ये विद्यार्थी ऑनलाईन सहभाग घेतलेला आहे.

विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना वाव देण्यासाठी व विद्यार्थ्यांमधील कौशल्य विकसित होण्यासाठी महाविद्यालयाने माजी विद्यार्थ्यांच्या सहभागातून विविध कोर्सचे आयोजन केले होते. त्यामध्ये

1) Online Certificate Course in Drafting and Pleading : 7 Days
2) Online Value Added Course on Communication Skills : 30 Days
3) Lecture Series on Career Opportunities in the field of Law : 7 Days

- **प्राध्यापक सहभाग :-**

शैक्षणिक वर्ष 2021-21 मध्ये विविध विद्यापीठ व महाविद्यालयांनी आयोजीत केलेल्या राष्ट्रीय व राज्यस्तरावरील कार्यशाळा, परिसंवाद, परिषद, ओरिएंटेशन आणि रिफ्रेशर प्रोग्राम मध्ये प्राध्यापकांनी संशोधन लेखांसह सहभाग नोंदवला.

- **निकाल :-**

शैक्षणिक वर्ष 2021-21 या वर्षीही महाविद्यालयाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परीक्षा 2020 मध्ये यशस्वी निकालाची परंपरा राखली आहे. महाविद्यालयातील अंतिम वर्षाच्या परीक्षेला बसलेल्या बी.ए.एलएल.बी.विद्यार्थ्यांचा 100% व एलएल.बी. विद्यार्थ्यांचा 94.87% निकाल लागलेला आहे.

- **राष्ट्रीय सेवा योजना :-**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व राष्ट्रीय सेवा योजनेअतंर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये वृक्षारोपण, शिक्षक दिन, माझे कुटूंब माझी जबाबदारी, दक्षत जागरुकता सप्ताह, राष्ट्रीय एकता दिवस, राष्ट्रीय शिक्षण दिवस, संविधान दिवस, माझी वसुंधरा अभियानाअंतर्गत हरित शपथ, मतदान जनजागृती, पराक्रम दिवस, जागतिक महिला दिन व थोर राष्ट्रपुरुषांच्या जयंती साज-या करण्यात आल्या.

- **विद्यार्थी विकास मंडळ :-**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व विद्यार्थी विकास मंडळाअंतर्गत माझे कुटूंब माझी जबाबदारी, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020, मराठी भाष संवर्धन पंधरवडा, मराठी भाष गौरव दिन व जागतिक महिला दिन इ. उपक्रम ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आले.

- **ग्रंथसंपदा :-**

महाविद्यालयाच्या ग्रंथालयात 26, 89,931 रुपयांची कायद्यासह विविध विषयांशी संबंधीत 9931 ग्रंथसंपदा आहेत. त्याव्यतिरिक्त 59,637 रुपयांची वार्षिक वर्गणी भरुन 16 नियतकालिके नियमीत येतात. ॲड. श्रीधर वैद्य यांनी महाविद्यालयाला कायद्यासह विविध विषयांशी संबंधीत पुस्तके भेट दिली.

महाराष्ट्र शासन आदेश क्रमांक न्यायाप्र-2016/(07/16) मशि-4, दि. 13 सप्टेंबर 2019 नुसार दि. 18/07/2020 पासून महाविद्यालय 25% अनुदानावर आलेले आहे.

श्री. राहूल साहेबराव देशमुख यांनी प्रभारी प्राचार्य म्हणून कामकाज पाहिले.

करीता सदर अहवाल सादर करीत आहोत.